स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
सहसंचालक उच्च शिक्षण ,मुंबई विभाग , मुंबई
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई -४०० ००१
www.jdhemumbai.gov.in E-mail- jdhemumbai@gmail.com Tel & Fax No. ०२२ २२६५६६००, २२६९१५२८

क्र.ससं/उशि/मुंवि/ग्रीन क्लब समन्वयक/२०२३/२८८२ दिनांक -१७.०८.२०२३

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित
कला,वाणिज्य, विज्ञान,विधी,शिक्षणशास्त्र
तसेच शारीरिक शिक्षण महाविद्यालये,
मुंबई विभाग.

विषय : ग्रीन क्लब समन्वयक प्राध्यापक (Green Club Faculty coordinator) यांची नियुक्ती करणेबाबत...

संदर्भ: १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मार्गदर्शक सूचनाक्र. संकीर्ण२०२२/प्र.क्र.१२९/विशि-५ दि. १३ जानेवारी २०२३
२. महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचे पत्र क्र. उशिसं/युनिसेफ/२०२३/७३२४ दि. २०.०६.२०२३
३. समविषयक प्रकरणी या कार्यालयाचे दिनांक ०३.०८.२०२३ चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून, महाराष्ट्र शासन व युनिसेफच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन 'युवकांच्या सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण तसेच पाण्याची बचत' (YEWS- Youth Engagement and Water Stewardship) हे अभियान राबविण्यात येतआहे.

या अभियानांतर्गत राज्यातील १३ निवडक जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयात (उच्चवतंत्रशिक्षण) शिकत असलेल्या युवक/युवतींची वातावरण, हवामानबदल आणि पाणी बचत याविषयी माहिती वृद्धिंगत करणे, कौशल्य विकसित करण्यासाठी प्रशिक्षणे घेणे, शैक्षणिक संस्थास्तरावर ग्रीनक्लबची स्थापना करणे, पाणीबचतीच्या उपाययोजना राबविणे, इत्यादी उपक्रम राबविले जाणारआहेत.

या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.३ नुसार सदरील अभियानाकरिता आपल्या महाविद्यालयातून एका ग्रीन क्लब फॅकल्टी कॉर्डिनेटर यांची नियुक्ती करुन त्यांची माहिती गुगल फॉर्मद्वारे सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते. तरी बहुतांश महाविद्यालयांनी सदर माहिती अद्याप सादर केलेली नाही. तरी ज्या महाविद्यालयांनी उपरोक्त माहिती अद्याप सादर केलेली नाही, त्या महाविद्यालयांनी खालील नमूद केलेला क्युआर कोड स्कॅन करून किंवा गूगल लिंक द्वारे सदरची माहिती तात्काळ सादर करावी.

गूगल फॉर्म लिंक: https://tinyurl.com/YEWS-Mumbai-GCFC

QR कोड:

सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.